Publication: Tarun Bharat
Date: 1/7/2019
Page: 2
Column: 1-4

तरुण भारत संवाद
सोमवार, १ जुलै २०१९

# अखेर गोरेगाव नवशाच्या पाड्यात वीज पोहचली

## तब्बल ७२ वर्षानंतर पहिल्यांदाच वीज जोडणी: आदिवासी बांधवांचा पेढे वाटून आनंद व्यक्त

वार्ताहर
जोगेश्वरी

गोरेगाव आरे कॉलनीतील नवशाच्या पाड्यात स्वातंत्र्यच्या ७२ वर्षानंतर पहिल्यांदाच वीज जोडणी आदिवासी बांधवांच्या घरात आली आहे. त्यानिमित्ताने नवशाच्या पाड्यात रविवारी वीज जोडणी उद्घाटन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. वीज जोडणी सोहळ्याचे उद्घाटन आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी सुप्रिया चव्हाण, आदिवासी ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आले.

आदिवासी बांधवांच्या घरात पहिल्यांदाच वीज आल्यामुळे आदिवासी बांधवांनी पेढे वाटून आनंद व्यक्त केला. नवशाच्या पाड्यात पहिल्या टप्पात ३७ घरांना वीजपुरवठा देण्यात आला आहे. अजून जवळपास ३० जणांना वीजपुरवठा देणे शिल्लक आहे. दुसऱ्या टप्पात राहिलेल्या घरांना लवकरात लवकर वीज जोडणी मिळणार असल्याचे आदिवासी हक्क सवंर्धन समिती, मुंबई यांनी सांगितले. आदिवासी बांधवांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे मुंबईतील सामजिक कार्यकर्ते व्यंकटेश चक्रवर्ती यांनी आदिवासी संघटनेशी संपर्क करुन आदिवासी बांधवांना वीज जोडणीसाठी १ लाख ९० हजारांची आर्थिक मदत केली. या आर्थिक मदतीमुळे आदिवासी बांधवांना वीज मिळण्यास मोलाची मदत मिळाली. त्यामुळे आदिवासी हक्क संवर्धन समिती आणि आदिवासी बांधवांनी चक्रवर्ती यांचे आभार मानले. आदिवासी हक्क संवर्धन संस्थेतर्फे रविवारी वीज जोडणी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आदिवासी विभाग प्रकल्प अधिकारी सुप्रिया चव्हाण, अदानी वीज कंपनीचे सुधाकर विदे, आदिवासी सामाजिक कार्यकर्ते प्रकाश भोईर, सुनील सुमडे, भिलिस्तान टायगर सेनेचे अध्यक्ष जयेश बारप, आदिवासी सामाजिक कार्यकर्ते सुनील कुमरे, जनआधार प्रतिष्ठानचे नीलेश धुरी, स्वदेशी ग्रुप टीम, आदिवासी संवर्धन समितीचे अध्यक्ष, इतर पदाधिकारी, आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी सुप्रिया चव्हाणांच्या हस्ते उद्घाटन झाले.